**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

**1. रेल्वे विकासाचे दीड लाख कोटी रुपयांचे प्रकल्प राज्यात सुरु असल्याचं रेल्वे मंत्री अश्विनीं वैष्णव यांचं लोकसभेत निवेदन**

**2. राष्ट्रीय गीत 'वंदे मातरमची' सर्व सहा कडवी वाजवण्याचे केंद्र सरकारचे निर्देश जारी**

**3. एस.टी. प्रवासाचा नवा डिजिटल युगारंभ; सवलत धारकांसाठी 'NCMC' स्मार्ट कार्ड अनिवार्य**

**4. वीजदर कमी करण्याची घोषणा करून जनतेची दिशाभूल राज्य सरकार करत असल्याचा काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांचा आरोप**

---------------------------------------------

**राज्य रेल्वे प्रकल्प**

राज्यात एक लाख ५० हजार कोटी रुपयांचे, प्रकल्प सुरू असल्याची माहिती, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिली. अहिल्यानगरचे खासदार, निलेश लंके यांनी आज, लोकसभेत प्रश्नोत्तराच्या काळात, वंदे भारत गाड्यांची वाढती संख्या पाहता, त्यांची तांत्रिक देखभाल आणि विश्वसनीयतेसाठी, विशेष पायाभूत सुविधांची आवश्यकता, असल्याकडे लक्ष वेधलं.वंदे भारतसाठी अहिल्यानगरमध्ये, मेन्टेनन्स अर्थात देखभाल डेपो उभारण्यासंदर्भात, त्यांनी प्रश्न विचारला, तसंच या गाड्यांमध्ये स्थानिक खाद्यपदार्थ, समाविष्ट करण्यासंदर्भात आणि या, खानपान आणि व्यवस्थापनात, महाराष्ट्रातले स्थानिक बचत गट आणि तरुणांना रोजगार देण्यासंदर्भात, सरकार धोरण तयार करेल का, यासंदर्भात लंके यांनी प्रश्न विचारले.यावर उत्तर देताना, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी, राज्यातल्या रेल्वेसाठी, केंद्र सरकारने केलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. राज्यातल्या रेल्वेप्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात, २३ हजार ९२६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असं ते म्हणाले

***(होल्ड बाईट वैष्णव १८ सेकंद )***

दरम्यान,लोकसभेचे सभापती, ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव, विरोधी पक्षांनी लोकसभेच्या, महासचिवांना सादर केला होता. यात काही त्रुटी आढळल्यामुळे, तो फेटाळला जाऊ नये म्हणून, त्यात दुरुस्ती करावी अशी सूचना, ओम बिर्ला यांनी सचिवालयाला केली. त्यानंतर त्यात दुरूस्ती करून ठराव पुन्हा सादर करण्यात आला. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या ११८ सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे.

-----------------------------------------------

**सौर ऊर्जा**

देशाची सौरऊर्जेच्या माध्यमातून, उर्जा निर्मितीची क्षमता, १४४ गिगा वॅट इतकी झाली आहे. नवीन आणि नवीकरणीय उर्जामंत्री, प्रल्हाद जोशी यांनी आज, लोकसभेत एका पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात, ही माहिती दिली.या आधी देशात, केवळ सहा ते सात टक्क्यांपर्यंत, सौर ऊर्जानिर्मिती होत होती, यात वाढ झाली असून, आता देश ऊर्जाक्षेत्रात निर्यातीकडे वाटचाल करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

अजित पवार यांच्या अपघाताची, चौकशी सुरू असून, याचं सत्य बाहेर येईल, मात्र या घटनेचा, राजकारणासाठी वापर होऊ नये याची काळजी प्रत्येकानं, घ्यायला हवी असं आवाहन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, केलं आहे.ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. भारतीय तपास यंत्रणेवर अविश्वास व्यक्त करणं चुकीचं असल्याचंही ते म्हणाले. आपण केंद्र सरकारला पत्र पाठवलं आहे, अपघातग्रस्त विमानाचे ब्लॅक बॉक्स मिळाले आहे, त्यामुळे तपास पूर्ण व्हायची, वाट पाहावी असं, ते म्हणाले.

-----------------------------------------------

**वंदे मातरम**

केंद्र सरकारने राष्ट्रीय गीत, वंदे मातरम संदर्भात, आज नवे दिशानिर्देश जारी केले. त्यानुसार, सरकारी कार्यक्रमांमध्ये, शाळांत तसंच इतर महत्त्वाच्या कार्याक्रमांत, जन-गण-मन या राष्ट्रगीतानंतर लगेच वंदे मातरम् वाजवणे, अनिवार्य असेल. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधी कडून....

***(होल्ड बाईट हेमांगी - ३६ सेकंद)***

***वंदे मातरम गीताची, सर्व सहा कडवी वाजवली जातील. यापूर्वी वंदेमातरमची, दोनच कडवी प्रचलित होती, आता मात्र हे गीत संपूर्ण वाजवलं जाईल असं, या दिशा***

*निर्देशांमध्ये म्हटलं आहे. राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांच्या आगमन-प्रस्थानाच्या वेळी, त्यांच्या भाषणापूर्वी आणि नंतर तसंच, राष्ट्र ध्वजारोहणाच्या वेळी हा नियम लागू राहील.गृह मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलंय की, हे गीत वाजवले किंवा गायलं जात असताना, उपस्थितांनी सावधान मुद्रेत उभे राहावं. चित्रपटगृहातल्या मध्यंतराचा मात्र या नियमात समावेश नाही.*

---------------------------------------------

**पोलीस भरती**

यवतमाळमध्ये, जिल्हा पोलीस दलाच्या वतीनं, पोलीस शिपाई संवर्गातील, 150 आणि बॅण्ड्समन संवर्गातील, 11 पदांची पोलीस भरती प्रक्रिया, आज पहाटे चार वाजेपासून सुरू झाली. पळसवाडी पोलीस कवायत मैदानावर, ही भरती प्रक्रिया होत आहे. 25 फेब्रुवारी पर्यंत, शारीरिक चाचणी घेतल्या जाईल.150 शिपाई पदासाठी, 12 हजार 93 अर्ज प्राप्त झाले असून, बॅण्ड्समन संवर्गातील 11 पदांसाठी, १,६८७ अर्ज आलेत. पोलीस भरतीसाठी 60 अधिकारी आणि 410 पोलीस अंमलदार तैनात आहेत. पोलीस भरती पारदर्शक होण्याच्या दृष्टिकोनातून, जागोजागी सी.सी.टीव्ही कॅमेरे तसंच, आर.एफ.आय.डी. या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे.चंद्रपूर जिल्ह्यातील, २१५ पोलीस शिपाई पदांसाठी, राज्यभरातून २०,६८३ उमेदवारांनी, अर्ज केले असून, प्रथम शारीरिक मोजमाप, मैदानी चाचणी आणि त्यानंतर, लेखी परीक्षा घेतली जाणार आहे.

---------------------------------------------

**NCMC स्मार्ट कार्ड**

राज्य मार्ग परिवहन महामंडळानं प्रवाशांसाठी, 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' N.C.M.C. प्रणाली लागू करण्याचा, ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या स्मार्ट कार्डद्वारे, रोखविरहित व्यवहार, सवलतींची अचूक नोंद आणि पारदर्शक प्रतिपूर्ती, शक्य होणार असल्याची माहिती, परिवहन मंत्री, प्रताप सरनाईक यांनी दिली.यापुढे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग, पुरस्कारार्थी आणि पत्रकारांसाठी, सवलतींचा लाभ घेण्यासाठी, हे कार्ड अनिवार्य असेल. या प्रकल्पासाठी, एस.टी.महामंडळानं, ई-बिक्स टेक्नोलॉजिस लि. आणि N.S.D.L.पेमेंट्स बँक, यांच्याशी करार केला आहे.नवीन कार्डाची किंमत १९९ रुपये असून, जुन्या स्मार्ट कार्डधारकांना, १४९ रुपयांत उपलब्ध होणार आहे. किमान १०० रुपयांपासून, रिचार्ज सुविधा उपलब्ध असून, वेबसाइट, मोबाईल ॲप आणि एजंटमार्फत रिचार्ज करता येणार आहे.३,००० हून अधिक, अधिकृत एजंटमार्फत आणि बसस्थानकांवरच, नोंदणी होणार असल्यानं, ग्रामीण प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

---------------------------------------------

**अतुल लोंढे**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, वीजदर कमी करण्याची घोषणा करून, जनतेची दिशाभूल केली असून, प्रत्यक्षात वीजदर १६ टक्क्यांनी वाढणार असल्याचा आरोप, काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते, अतुल लोंढे यांनी केला. मुंबईत पत्रकार परिषदेत, बोलताना त्यांनी सांगितले की, महावितरणनं, एम.ई.आर.सी.कडे २० ते ४० टक्के दरवाढीचा प्रस्ताव सादर केला असून, त्याचा भार, सर्वसामान्य ग्राहक आणि लघु-मध्यम उद्योगांवर पडणार आहे.शेजारील कर्नाटक, तेलंगणा आणि गुजरातच्या तुलनेत, महाराष्ट्रात वीजदर जास्त असल्याचे त्यांनी नमूद केले.एम.ई.आर.सी.नं, पूर्वीचा बहुवर्षीय दर निर्धारण, आदेश बदलताना जनसुनावणी न घेतल्याचा आक्षेपही, त्यांनी उपस्थित केला. या प्रक्रियेवर मुंबई उच्च न्यायालयानेही आक्षेप नोंदवत, जुन्या आदेशानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचं, लोंढे यांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**मिशन ऑर्गेनिक विदर्भ**

लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, ॲल्युमिनियम असोसिएशनतर्फे, 'मिशन ऑर्गेनिक विदर्भ'चं उद्घाटन, १३ फेब्रुवारी रोजी नागपूर इथं होणार आहे. या उपक्रमांतर्गत, १३ आणि १४ मार्च रोजी, ॲग्रो इनपुट विक्रेते, तज्ज्ञ आणि प्रगत शेतकऱ्यांसाठी, नि:शुल्क प्रशिक्षण कार्यशाळेचं आयोजन करण्यात आलं आहे.सेंद्रिय शेतीला चालना देणे आणि विदर्भातील कृषी विकास साधणे हा या मिशनचा उद्देश असल्याचं आयोजकांनी सांगितलं.

-----------------------------------------------

**ISACP**

I.S.A.C.P. अर्थात इंडियन सोसायटी ऑफ ॲनिमल प्रॉडक्शन आणि नॅशनल असोसिएशन ऑफ, वेटरनरी ॲनिमल रिसर्च N.A.W.A.R. यांच्या संयुक्त विद्यमानं, उद्या रजत जयंती सभागृह, वेटरनरी कॉलेज इथं I.S.A.C.P.-2026 - N.A.W.A.R. परिषद आयोजित करण्यात येत आहे.या परिषदेस, I.S.A.C.P.चे अध्यक्ष, डॉ.एस.प्रथाबन आणि N.A.W.A.R.चे अध्यक्ष, डॉ.एस.बी.बारबुद्धे यांचं नेतृत्व लाभणार आहे. परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी, माननीय आमदार तथा माफसू कार्यकारी परिषदेचे सदस्य, डॉ.परिणय फुके हे, प्रमुख पाहुणे म्हणून, उपस्थित राहून, मार्गदर्शन करणार आहेत.याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून, या कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, सरसंघचालक डॉ.मोहन भागवत उपस्थित राहणार आहेत.

-----------------------------------------------

**'एआय फॉर ॲग्री २०२६'**

‘महाराष्ट्र कृषी-कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२५-२०२९’ अंतर्गत ‘एआय फॉर अ‍ॅग्री २०२६’ ही जागतिक कृषी व गुंतवणूक शिखर परिषद २२ व २३ फेब्रुवारी रोजी मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार आहे.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली

----------------------------------------------